# जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर, यांचे कार्यालय,

ई-मेल- chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांकः- एमएजी/कार्या-8/टे-1/2023/66 दिनांकः- 25 / 01 /2023

## जाहिर सुचना

मा. संचालक, अभियोग संचालनालय, म. रा. मुंबई यांचे आदेशाप्रमाणे चंद्रपूर जिल्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 25 (3) अन्वये चंद्रपूर जिल्हयातील ज्या न्यायालयात नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची नेमणूक झाली नाही अशा न्यायालयातील फौजदारी प्रकरण चालविण्याकरीता अस्तित्वात असलेले पॅनल कायम ठेवून नविन 07 विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| 1 | अर्ज स्विकारण्याची तारीख | 27/01/2023 |
| 2 | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | 10/02/2023 |
| 3 | पात्र उमेदवारांची यादी जिल्हयाच्या www.chanda.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | 27/02/2023 |
| 4 | मुलाखत व दस्ताऐवज पडताळणी दिनांक व वेळ | पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेवून मुलाखतीचा दिनांक व वेळ कळविण्यात येईल. |
| 5 | अंतिम यादी | उमेदवारांची मुलाखतीनंतर गुणवत्ता यादीनुसार अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. |

तरी इच्छुक वकीलांनी खाली दिलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून दिनांक 10/02/2023 पर्यत आपले अर्ज परिपूर्ण भरुन विहित नमुण्यात जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, चंद्रपूर **येथे कार्यालयीन वेळेत अचुक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तिक तपशीलासह (बायोडाटा) संबंधीत दस्ताऐवजाचे छायांकित तसेच स्व:सांक्षाकित कागदपत्राच्या प्रतीसह सादर करावे.**

**उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

**अटी व शर्ती :-**

1. सदरची पदे चंद्रपूर जिल्हा ठिकाण आणि तालुका स्तरावरील असलेल्या न्यायालयात प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात सरकारी पक्षातर्फे केसेस चालविणेकरीता प्रस्तावित आहेत.
2. सदर पदे ही फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 25 (3) अन्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर आहेत.
3. या निवड प्रक्रियेमार्फत निवड झालेल्या उमेदवारांना या निवडीच्या आधारावर भविष्यात स्थायी शासन सेवेत सामावून घेण्याचा अधिकार राहणार नाही व त्याबाबतचे कोणतेही विनंती अर्ज विचारात घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
4. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक ही पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असुन विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे ठिकाणी नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक झाल्यास किंवा काम करीत असलेले न्यायालय बंद झाल्यास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक आपोआप रद्द करण्यात येईल.

अशाप्रकारच्या नियुक्त्या पुर्ववत नियमामधील तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही वेळी कोणतीही पुर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार शासन राखुन ठेवीत आहे. तसेच विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना चंद्रपूर शहर किंवा चंद्रपूर जिल्हयातील तालुका न्यायालयाच्या ठिकाणी नियुक्ती मिळाल्यास त्या ठिकाणी जावून काम करणे बंधनकारक राहील.

5. सदर विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक झाल्यानंतर आवश्यकतेनुसार मिळालेल्या ठिकाणावरुन प्रशासकीय/न्यायालयीन कामकाजात अथडळा होवू नये म्हणून जिथे बदलीवर पाठविले जाईल तिथे रुजू होवून काम करण्यास बंधनकारक राहील.
6. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरुपातील नेमणूक रद्द करण्यात येईल.
7. तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवर निवड झालेल्या विशेष सहा. सरकारी अभियोक्त्यांची चंद्रपूर जिल्हयातील कोणत्याही न्यायालयात काम करण्याची तयारी असावी व त्यांना महाराष्ट्र शासना विरुध्द खाजगी व्यक्ती तर्फे खटल्यात काम करता येणार नाही.
8. जिल्हयाचे सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असल्याने त्यांच्या सुचनेचे व आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.
9. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक म्हणून नियुक्तीत असलेले तसेच कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही.
10. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे पद मानधना नुसार असून पुर्णत: अस्थायी स्वरुपाचे आहे. त्यांना शासकीय पदाचे कोणतेही लाभ अथवा फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

**नियुक्तीसाठी पात्रतेचे निकष:-**

1. अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.
2. अर्जदार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा विधी पदवीधर असावा आणि बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे वकील म्हणून नोंदणी केलेली असावी.
3. उमेदवार वकील संघाचा सदस्य असावा.
4. सर्वसाधारण उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी नसावे 38 पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीयांसाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.
5. अर्जाचा नमुना **www.chanda.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
6. उमेदवारास कमीत कमी 5 वर्षे फौजदारी प्रकरणे चालविण्याचा अनुभव असावा तसेच अनुभवा बाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची यादीनुसार छायांकित व स्व: सांक्षाकीत प्रती सादर कराव्यात.
   1) मराठी/इंग्रजी/हिंदी भाषेचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र 2) बार कॉन्सिल नोंदणीचे प्रमाणपत्र 3) बार असोसिएशनचे नोंदणी प्रमाणपत्र 4) कायद्याची पदवी 5) जात प्रमाणपत्र 6) जन्म तारखेचा दाखला 7) दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे चारित्र्यसंबंधीचे प्रमाणपत्र 8) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचेकडील चारित्र्यपुर्व पडताळणी दाखला.
7. उमेदवारावर कोणत्याही प्रकारची फौजदारी स्वरुपाची केस प्रलंबित नसावी किंवा त्यास शिक्षा झालेली नसावी.
8. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास जेव्हा सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांचेकडे काम असेल तेव्हाच काम देण्यात येईल.

9. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास शासनाविरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी स्वरुपाचे काम करता येणार नाही.
10. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयात काम दिल्यास गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी सुचित केलेल्या मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात येईल.
11. उमेदवाराचे अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.
12. उमेदवाराच्या मुलाखती मध्ये न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात चालणा-या सर्व प्रकरणांच्या कायदयामध्ये झालेल्या सुधारणा व न्यायनिवाडा याबाबत उमेदवारांची मौखीक चाचणी घेण्यात येईल.
13. उमेदवाराने मौखिक चाचणीचे वेळेस अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणी करीता सोबत आणणे बंधनकारक राहील.
14. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे पद मानधना नुसार असुन पुर्णत: अस्थायी स्वरुपाची आहे. त्यांना शासकीय पदाचे कोणतेही लाभ अथवा फायदे अनुज्ञेय असणार नाही. ज्यादिवशी न्यायालयात काम केले त्यादिवसाचे मानधन शासन निर्णय डीपीपी -2012/प्र.क्र.117/पोल-10 दिनांक 15/07/2013 याप्रमाणे मिळेल.

**मानधन** :-

| | | |
|---|---|---|
| 1) | प्रतिदिन परिणामकारक सुनावणीसाठी फी | रुपये 600/- |
| 2) | एका जामिन अर्जाच्या विरोधाकरीता | रुपये 400/- |
| 3) | प्रतिदिन एकुण कमाल मर्यादा | रुपये 1000/- |

(**टिप** :- एकापेक्षा जास्त सुनावणी किंवा जामिन अर्जाच्या विरोधात काम चालविले तरी प्रतिदिन कमाल मर्यादा रुपये 1000/- राहील )

15. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक नियुक्ती असलेले कितीही वर्षे काम पहिले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदावर हक्क सांगता येणार नाही.
16. जिल्हयाचे सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता हे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असल्याने त्यांच्या सुचनेचे व आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.
17. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची कंत्राटी पध्दतीनुसार मानधनावर निवड करण्यात येत असून निवड झालेले विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना नियमीत शासकीय पदावर हक्क बजावता येणार नाही.
18. सर्व इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अंतिम दिनांक 10/02/2023 सायंकाळी 5.00 वाजेपर्यत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे पाठवावे.
19. मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची निवडसुची हि **www.chanda.nic.in** वर प्रसिध्द करण्यात येईल. व मुलाखतीस पात्र झालेल्या उमेवारांनी आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित राहण्याकरीता दिनांक व वेळ कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
20. मुलाखतीत निवड झालेल्या उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी **www.chanda.nic.in** वर प्रसिध्द करण्यात येईल.

स्वा/-
(विनय गौडा जी सी)
**जिल्हाधिकारी चंद्रपूर**

प्रतिलीपी:-

1. मा.संचालक, अभियोग संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीस सविनय सादर.
2. उप संचालक अभियोग संचालनालय, नागपूर परिक्षेत्र नागपूर यांना माहितीस्तव.
3. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना माहितीस्तव.
4. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, कार्यालय प्रशासकीय इमारत पहिला माळा खोली क्र. 07 चंद्रपूर यांना माहितीस्तव.
5. अधिक्षक,जिल्हा व सत्र न्यायालय,चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहिर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
5. अधिक्षक,दिवाणी व फौजदारी न्यायालय/तालुका------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहिर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
6. उपविभागीय अधिकारी, ------------------------------------(सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.सोबत संलग्न केलेली जाहिर सूचना कार्यालयाचे कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
7. तहसिलदार-------------------------- (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहिर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
8. अध्यक्ष/सचिव चंद्रपूर बार असोसिएशन चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की सदर जाहिर सूचना बार काऊंसीलच्या सूचना फलकावर प्रसिध्द करुन सर्व सदस्यांना अवगत करावे. त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.
9. अध्यक्ष/सचिव तालुका बार असोसिएशन ---------------------- जि.चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की सदर जाहिर सूचना बार काऊंसीलच्या सूचना फलकावर प्रसिध्द करुन सर्व सदस्यांना अवगत करावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.
10. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, (NIC) जिल्हा कार्यालय, चंद्रपूर यांनी सदर जाहिर सुचना आणि अर्जाचा नमुना **www.chanda.nic.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
11. जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय,चंद्रपूर वरील सुचना जिल्हाधिकारी कार्यालय नोटिस बोर्डावर लावून प्रसिध्द करावी. व अहवाल सादर करावा.

जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

जिल्हाधिकारी चंद्रपूर

# Application for the post of Special Assistant Public Prosecutor

(Section 25(3) of Criminal Procedure Code 1973)

| For Office Use Only | Latest/recent Colour Photo of the applicant |
|---|---|
| Application No.<br>Application Received on. | |

1. Full name of the applicant, Surname first:--------------------------------------

(In Block Capital Letter)--------------------------------------

Father's/Husband's Name: ------------------------------------------------------

2. Address

| Permanent Adress | Temporary Adress |
|---|---|
| Room/Flat/Bldg No. | Room/Flat/Bldg No. |
| Road | Road |
| Village/Post- | Village/Post- |
| Taluka- | Taluka- |
| District/city- | District/city- |
| State- | State- |
| Pin- | Pin- |
| E-mail-<br>Mobile No. | E-mail-<br>Mobile No. |

3. (a) Date of Birth :-

   (b) Age on the date of advertisement :-

4. Category (Open/ SC/ ST/ OBC) :-

5. Place of birth :-
   (in Block Capital Letters)

6. PAN Number :-

7. Aadhar Number :-

8. Wheather candidate is domiciled in theState of Maharashtra :-

9. Wheather enrolled as member of the Bar Council of Maharashtra and Goa (Specify the registration no. & date) :-

10. Education qualification and experience

(a) Details of the examination passed for graduate, Law graduate, Post-graduate

| Name of the examination | Name of University | Class/Div. | Year of Passing |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(b) Total number of years of practice :-

| Name of the Courts where practiced | Total No. of Civil Matters Conducted | Total No. of Criminal Matters conducted | Total No. of Service Matter Conducted |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(c) Total number of Sessions Cases and Criminal Appeals & Revisions personally conducted before the Sessions Cort. (Please specify the number of cases):-

------------------------------------------------------------------------

11. Previously worked as Special Public Prosecutor? If any :-

| Post held | Date of Joining | Date if Leaving | Reasons for Leaving |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

12. Languages Known :-

| Language | Hindi | English | Marathi |
|---|---|---|---|
| Read | | | |
| Write | | | |
| Speak | | | |

13. Have you ever been arrested/detained/prosecuted Bound down/convicted/faced any criminal :- Yes / No

prosecution by in a Court of Law for any offence
If you, give details thereof :-

14. Whether you are facing/have ever faced any disciplinary action from the Bar Council of India or Bar Council of Maharashtra and Goa or any Bar Association or any other professional body. :- Yes / No

## DECLARATION

1. I have not been compulsorily retired, removed or dismissed from judicial service or from service in Government of Statutory or Local Authority or failed to complete probation period in judicial service on any post or in Government or Local Authority.
2. I have not been convicted of an offence involving moral turpitude.
3. I have never been permanently debarred or disqualified by any Public Service Commission or Government Department/Body or District Court or High Court from appearing for any examination or selection conducted for the purpose of recruitment .
4. I do hereby affirm that all the details filled up in the application are true and correct as per my knowledge, my appointment as a Law Officer, if made shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action.

Date :-

Place :- Signature of the Applicant

N.B.

1. Candidate shall append the true copis testimonials/certificates and document, duly attested. (Self-attested copies may also be considered)
   - i. Educational Certificates
   - ii. Proof of Date of Birth
   - iii. Experience Certificate
   - iv. Copy of Degree
   - v. Other documents in support of claims.

2. The applicant shall affix his recent passport size colour photograph with his signature thereon.
3. Unsigned applications, applications not properly filled up by the candidate and applications without necessary enclosures are liable to be rejected summarily.